महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बॅंक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


# दंतशल्यचिकित्सक, सामान्य राज्य सेवा, गट-ब

**धारिका क्रमांक : ९४७/८४०४/ पंधरा-अ** **जाहिरात क्रमांक : ८७/२०१५**

**आयोगामार्फत महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या नियंत्रणाखालील आरोग्य सेवा संचालनालय मुंबई कार्यालयांतर्गत दंतशल्यचिकित्सक, गट-ब, वर्ग-२ [Dental Surgeon, Group-B, Class-II]** या पदाच्या **एकशे एकोणनव्वद जागांच्या** भरतीसाठी **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. एकूण पदे:- १८९ (चालू रिक्त १८९)**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **२३** | **१३** | **५** | **४** | **६** | **४** | **४** | **३५** | **९४** | **९५** | **१८९** |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक /समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १५ | ८ | ३ | ३ | ४ | ३ | ३ | २३ | ६२ | ६२ | १२४ |
| अ) महिला (३०%) * | ७ | ४ | २ | १ | २ | १ | १ | १० | २८ | २८ | ५६ |
| ब) खेळाडू (५%) ☑ | १ | १ | - | - | - | - | - | २ | ४ | ५ | ९ |
| क) अपंग (३%) | **एकूण १८९ पदांपैकी ६ पदे विकलांगासाठी आरक्षित. २ पदे श्रवण शक्तीतील दोष ( Hearing Impairment), २ पदे क्षीणदृष्टी (Low Vision) व २ पदे चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु (Locomotor Disability or Cerebral Palsy) (विकलांग उमेदवार उपलब्ध न झाल्यास विकलांगासाठी आरक्षित असलेली पदे खुल्या प्रवर्गातून रिक्त ठेवण्यात येतील.** | | | | | | | | | | |

*** उपलब्ध असल्यास महिलांसाठी आरक्षित ☑ उपलब्ध असल्यास खेळाडूसाठी आरक्षित**

**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.२** *सार्वजनिक आरोग्य विभागाच्या* शासन निर्णय क्रमांक अपंग-२००४/५५/समन्वय-२ दिनांक २७ फेब्रुवारी, २००९ नुसार प्रस्तुत पदासाठी श्रवण शक्तीतील दोष ( Hearing Impairment), क्षीणदृष्टी (Low Vision) व चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु (Locomotor Disability or Cerebral Palsy) असे विकलांगत्व असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र आहेत.

**२.३ वि.जा.(अ) भ.ज. (ब) भ.ज. (क) व भ.ज. (ड)** या वर्गवारीसाठी आरक्षित पदावर योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासनाच्या अंतर्गत परिवर्तनीयतेच्या धोरणानुसार सदर पद वि. जा. (अ), **भ.ज. (ब) भ.ज. (क) व भ.ज. (ड)** या वर्गवारीतून गुणवत्तेनुसार भरण्यात येईल.

**२.४** मुलाखतीसाठी पाचारण केलेल्या उमेदवारांनी त्यांची खेळाडू बाबतची प्रमाणपत्रे क्रिडा संचालनालयाकडून प्रमाणित करुन घ्यावीत.

**३. वेतनश्रेणी:- रु. ९,३०० - रु. ३४,८०० ग्रेड पे रु. ५,४००/-**

**४. पात्रता:-** उमेदवार भारतीय नागरिक असावा.

**४.१ वय:- दिनांक १ नोव्हेंबर, २०१५ रोजी वय ३५ वर्षे व मागास वर्गवारीकरीता ४० वर्षापेक्षा जास्त नसावे.**

**४.२** महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही.

**४.३** शासन आदेशानुसार विकलांग, खेळाडू व माजी सैनिक इत्यादींसाठी वयोमर्यादा नियमानुसार शिथिलक्षम राहील.

**४.४** खेळाडूंचे आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील. खेळाडूसाठी राखीव पदाकरीता दावा करणा-या उमेदवारांना त्याची पात्र खेळाडू असल्याबाबतची प्रमाणपत्रे मुलाखतीच्या तारखेपूर्वी क्रीडा संचालनालयाकडून प्रमाणित करणे बंधनकारक असेल. तसेच मुलाखतीच्या दिवशी खेळाडू प्रमाणपत्र प्रमाणित केलेले नसेल, तर त्या उमेदवाराचा खेळाडूचा दावा आयोग ग्राहय धरणार नाही.

**४.५** अपवादात्मक शैक्षणिक अर्हता किंवा अपवादात्मक अनुभव किंवा दोन्ही धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याविषयी आयोग विचार करु शकेल. परंतु आयोगाच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा

मुलाखतीसाठी पुरेसे उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल. अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध उमेदवारांच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वयोमर्यादेच्या सवलतीकरीता विचारात घेतले जातील. अनुभवाच्या संदर्भात ज्या पदावरील किमान अनुभव मागितला असेल त्यापेक्षा वरिष्ठ पदावरील अनुभव वयोमर्यादा शिथिल करणास्तव विचारात घेतला जाईल.

**४.६ शैक्षणिक अर्हता व अनुभव :-**

Candidate must :

(i) Possess a degree in Bachelor of Dental Surgery as included in Part –I or Part-III of the Schedule to the Dentists Act, 1948 (16 of 1948) **and thereafter**

**(ii)** have experience of not less than one year as a Clinical Assistant or in any post which in the opinion of the Government is equivalent to or higher than, the post of Clinical Assistant, gained after acquiring the qualilfiction mentioned in sub-clause (i) above.

**Provided further that, preference may be given to candidates possessing post-graduate qualification in Dental Sciences.**

**(iii)** If at any stage of selection, the Commission is of the opinion that sufficient number of candidates possessing the requisite experience are not available to fill in the vacancies reserved for candidates belonging to the Scheduled Castes, Scheduled Tribes, Denotified Tribes, or Nomadic Tribes, then the Commission may, in the matter of such selection, relax the requirement upto 40% in respect of period of experience and select suitable candidates belonging to such Castes or Tribes**.**

**४.७** A person appointed to the post by nomination shall be on probation for a period of two years.

**४.८** The selected candidate will have to get him/her self registered under the Dentists Act. 1948 (16 of 1948) before joining duty.

**४.९** The selected candidate will be debarred from doing any private practice but will be paid compensatory allowance in lieu there of according to the rules.

**४.१०** The selected candidate will have to sign an agreement embodying the conditions of his service including the conditions to serve the Government for a period of five years or in default to pay a penalty of Rs. 500/- or such other sum as may be prescribed by Government.

**५.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव इत्यादी अर्हता व अनुभव किमान असून, किमान अर्हता व अनुभव धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव याच्या आधारे किंवा अन्य योग्य निकष निश्चित करुन अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. तसेच अपवादात्मक शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अपवादात्मक अनुभवाच्या तरतुदीच्या अनुषंगाने वयोमर्यादा शिथिल केली जाणार नाही. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि/अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क,निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**६. जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

**७. कर्तव्ये व जबाबदा-या :-** प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

**८. शुल्क :- १) अमागास - रु. ५१५/- २) मागासवर्गीय - रु. ३१५/-**

**९. ज्या मागासवर्गीय उमेदवारांनी वयोमर्यादा, परीक्षा शुल्क किंवा पात्रतेच्या निकषांमध्ये कोणतीही सवलत किंवा सूट याचा फायदा घेतला आहे. अशा उमेदवारांची सर्वसाधारण (अमागास) वर्गवारीच्या पदावर शिफारस करण्यात येणार नाही.**

**१०.** प्रस्तुत पदांना शासनाने दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी निर्गमित केलेली महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली वाटप नियम, २०१५ लागू आहे.

**११. शासन सेवेत सरळसेवा भरतीकरिता समांतर आरक्षण कार्यान्वित करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ नुसार कार्यवाही करण्यात येईल.**

**१२. अर्ज करण्याची पध्दत –**

**१२.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**१२.२** पात्र उमेदवारांना वेब-बेस्ड (Web-based) ऑन लाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.inया वेबसाईटद्वारे **दिनांक ३१ जुलै, २०१५ ते दिनांक २० ऑगस्ट, २०१५** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

**१२.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**१२.४** विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**१२.५** आयोगाने निश्चित केलेला परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट **बँकेमध्ये** चलनाव्दारे (२) नेटबँकिंग (३) डेबीट कार्ड (४)क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र/ सीएससी (नागरीक सेवा केंद्र)

**१२.६** www.mahaonline.gov.in व https://mahampsc.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतींमध्ये) आणि सीएससी ची सूची उपलब्ध आहे.

**१२.७** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

(२) " माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह असेल. ज्या पदासमोर ' **Unpaid** ' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी '**Pay Now**' अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) "**Pay Now**" या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. (१) ऑनलाईन पेमेंट (२) नागरी सुविधा केंद्र (३)चलानद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**१३.** चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास उमेदवारास चाळणी परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर प्रवेश प्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलव्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमदेवाराने चाळणी परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व चाळणी परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१४.** चाळणी परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय चाळणी परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१५.** आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधन आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

**१६. उमेदवाराने** मुलाखतीच्यावेळी **सर्व आवश्यक मूळ** प्रमाणपत्रे **सादर करणे आवश्यक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीचे वेळी सादर न केल्यास अथवा ती योग्य नसल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

**१७. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची, तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक २० ऑगस्ट, २०१५ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

**१८. चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ पर्यंत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

**ठिकाण :- मुंबई**
**दिनांक :- ३१ जुलै, २०१५**

**राजन बा. खोत**
**उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग**